महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी निर्मित केलेल्या स्वतंत्र सक्षम प्राधिकारी कार्यालयाकरिता नियंत्रक अधिकारी घोषित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्रमांकः एमपीआय- १११७/प्र.क्र.७२७/पोल-११

दुसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक

मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२

तारीखः १६ मार्च, २०१८

वाचा :

गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक: एमआयएस २०१५/प्र.क्र.१३०१/पोल-११, दि.२९ जून २०१७.

प्रस्तावना :

महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी वाचा येथील शासन निर्णयान्वये सक्षम प्राधिकारी व इतर अनुषंगिक कर्मचारीवृंद असे एकून १२ पदे निर्माण करण्यात आलेली आहेत. उक्त वाचा येथील शासन निर्णयान्वये निर्माण केलेल्या स्वतंत्र सक्षम प्राधिकारी कार्यालयाकरिता आवर्ती व अनावर्ती खर्चाच्या अनुषंगाने वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८, भाग-पहिला, उपविभाग-एक, अ.क्र. १, नियम क्र. २ व अ.क्र.२ व ३, नियम क्र. २ अन्वये प्रदान केलेल्या वित्तीय मर्यादेनुसार कार्यवाही करण्यासाठी उपरोक्त स्वतंत्र सक्षम प्राधिकारी कार्यालयासाठी नियंत्रक अधिकारी (Controlling Officer) घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :

महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्वतंत्र सक्षम प्राधिकारी कार्यालयासाठी लेखाशीर्ष: “मागणी क्र. बी-१, २०५५ पोलीस, (००) (००१), संचालन व प्रशासन, (००) (०५) सक्षम प्राधिकारी (MPID).” (२०५५ A१०३) (योजनेत्तर) या लेखाशीर्षास मंजुरी देण्यात आलेली आहे.

उक्त लेखाशीर्षाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यासाठी **जिल्हाधिकारी, मुंबई शहर** यांना **नियंत्रक अधिकारी (Controlling Officer)** म्हणून घोषित करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/२०१३/विनियम भाग-२, दि.१७.४.२०१५ अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग पहिला, उपविभाग एक, अ.क्र.-१,

नियम क्र.२ अ.क्र.२ व अ.क्र.३, नियम क्र.२, अनुसार प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३१६१०४२१८७८२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

D J Shedmekhe

Digitally signed by D J Shedmekhe
DN: CN = D J Shedmekhe, C = IN
Date: 2018.03.16 15:59:23 +05'30'

दि. ज. शेडमेखे
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई
४. जिल्हाधिकारी, मुंबई शहर
५. उपजिल्हाधिकारी/ सक्षम प्राधिकारी, (MPID), मुंबई
६. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा), मुंबई/ नागपूर
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
८. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, वांद्रे, मुंबई
९. अवर सचिव, अर्थ-१, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
१०.निवडनस्ती (पोल-११ कार्यासन).